# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** मालेगांव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0227 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**12/03/2026 00:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिंनाक पासून):** 11/03/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 11/03/2026
**Time From (वेळेपासून):** 15:52 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:08 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 12/03/2026 **Time (वेळ):** 00:29 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 12/03/2026 00:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मराठा वाईनबाऱजवळ मालेगाव ,मालेगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): पोनी अल्का मोहन गायकवाड

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : मोहन गायकवाड

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रवि वाशिम ,वाशिम,वाशिम,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रवि वाशिम ,वाशिम,वाशिम,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8329033177

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेश बळीराम बाविस्कर | | | 1. डोंगरकिन्ही ,मालेगाव,मालेगांव, वाशिम,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच 2000 | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

2,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद

लाप्रवि वाशिम
कॅम्प पो.स्टे.मालेगाव
दिनाक :- 11/03/2026

मी अल्का मोहन गायकवाड, वय 38 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग वाशिम, मो.नं.8329033177

मी आज रोजी सरतर्फे समक्ष फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिंबध विभाग वाशिम येथे पोलीस निरीक्षक म्हणुन 04/09/2024 पासुन कार्यरत आहे. दि. 11/03/2026 रोजी लाप्रवि कार्यालय वाशिम येथे कर्तव्यावर हजर असतांना मला तक्रारदार यांचा फोन आला त्यांनी मला लोकसेकाविरुध्द लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगीतले. तसेच तक्रारी करीता मेहकर ते मालेगाव रोड वरील मुंगळा फाटा येथे भेटण्याचे सांगीतले वरुन पोलीस उपअधिक्षक, जगदीश परदेशी, लाप्रवि वाशिम यांनी मा.तहसिलदार वाशिम यांना दिंनाक 09/03/2026 रोजी पत्र देवुन प्राप्त केलेले व लाप्रवि कार्यालय वाशिम येथे हजर असलेले तहसिल कार्यालय वाशिम येथील दोन पंच यांना सापळा कारवाई करीता देणे करीता मा.पोलीस उपअधिक्षक, जगदीश परदेशी लाप्रवि वाशिम यांना पत्र देउन दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले.

दि.11/03/2026 रोजी आम्ही, सापळा पथक व पंच असे खाजगी चारचाकी वाहनाने मालेगाव ते मेहकर रोड वरील मुंगळा फाटा येथे जाउन तक्रारदार यांची भेट घेतली असता त्यांनी त्यांचे नाव श्री.दिपक प्रल्हाद गवई, वय 35 वर्षे, व्यवसाय - शेती रा. मु.पो.डोंगरकिन्ही ता.मालेगाव जि.वाशिम असे सांगीतले. त्यावेळी आम्ही त्यांना सापळा पथक तसेच दोन्ही पंचांची ओळख करुन देवुन त्यांची तक्रार नोंदवुन घेतली ती पुढीलप्रमाणे, "मी समक्ष येऊन तक्रार देत आहे की, मी वरील प्रमाणे असुन डोंगरकिन्ही येथे माझे कुटूंबासह राहतो. माझी आई श्रीमती जिजाबाई प्रल्हाद गवई हिचे नावाने डोंगरकिन्ही शेत शिवारात गट क्र.80 मध्ये साडे चार एकर शेती आहे. आम्ही एकुण 4 भाउ व 1 बहिण असे भाउ बहिण आहोत. माझे वडील 2008 मध्ये वारले. सर्व शेती हि माझे आईचे नावाने आहे. माझ्या आईला श्वसनाचा कन्सर झाल्याने आई 8 एप्रिल 2019 रोजी घरीच मरण पावली त्यावेळी तीच्या मरणाची नोंद ग्रामपंचायत डोंगरकिन्ही रेकॉर्डला करण्याची राहुन गेले. आता माझे आईच्या नावाने असलेले शेत आम्ही सर्व भाउ मिळुन करतो. सदर शेतीची वाटणी होवुन ती नावावर करावयाची असल्याने आईचा मृत्यु दाखला असणे गरजेचे आहे. त्यामुळे माझ्या आईचा मृत्युचा दाखला मिळण्याकरीता मी मागील बुधवारी आमचे डोंगरकिन्ही गावचे ग्रामपंचायत कार्यालयात गेलो होतो. तेथे माझी भेट ग्रामपंचायतचे शिपाई श्री बाविस्कर यांच्याशी झाली. माझी आई 2019 मध्ये मरण पावली व दाखला इतका उशिरा का पाहिजे अशी शिपाई श्री बाविस्कर यांनी मला विचारणा केली व तुझे काम मीच करुन देतो असे सांगीतले.

त्यानंतर दिंनाक 09/03/2026 रोजी माझा मोठा भाउ श्री सुधाकर गवई हा माझे आईचा मृत्युचा दाखला मिळावा या साठी रितसर लेखी अर्ज घेवुन ग्रामपंचायत डोंगरकिन्ही कार्यालयात गेला होता. त्यावेळी शिपाई श्री बाविस्कर यांनी त्यांला अर्जाची गरज नाही असे म्हणुन अर्ज न घेतल्याने तो घरी परत आला. दुसरे दिवशी दिंनाक 10/03/2026 रोजी मी स्वतः माझे आईच्या मृत्युचा दाखला घेण्याकरीता ग्रामपंचायत डोंगरकिंन्ही कार्यालयात गेलो असता मला ग्रामसेवक भेटले नाही. परंतु शिपाई श्री.बाविस्कर यांच्याशी भेट झाली असता श्री बाविस्कर यांनी माझ्या आईच्या मृत्यु चा दाखला तुम्हालौ मीच काढुन देतो. परंतु त्यासाठी मला 2,500 रुपये दयावे लागतील असे म्हटले. मी त्यांना मृत्युच्या दाखल्यासाठी इतके पैसे लागत नाही असे बोललो असता शिपाई श्री बाविस्कर यांनी पैसे न दिल्यास मृत्युचा दाखल मिळणार नाही असे मला सांगीतले. त्यावर मी शिपाई श्री बाविस्कर यांना ग्रामसेवक यांना जावून भेटू काय? असे बोललो असता शिपाई श्री. बाविस्कर यांनी ग्रामसेवकला भेटण्याची काहीही गरज नाही,

मृत्युचा दाखला मीच देतो त्यांच्या कडे जाण्याची किंवा कोणताही अर्ज करण्याची गरज नाही. तु 2500 रुपये दिले नाही तर दाखला मिळणार नाही असे मला सांगीतले. शिपाई श्री बाविस्कर हे मला माझे आईचा मृत्युचा दाखला देण्यासाठी माझ्याकडे लाच मागणी करीत असल्याचे माझ्या लक्षात आले. मला लाच दयावयाची इच्छा नसल्याने मी शिपाई बाविस्कर, ग्रामपंचायत कार्यालय डोंगरकिन्ही यांच्यावर कारवाई होण्याकरीता तक्रार देत आहे.

शिपाई बाविस्कर, ग्रामपंचायत कार्यालय डोंगरकिन्ही यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किंवा उसणवारीचा व्यवहार नसून आपशी दुश्मनी नाही त्यांना माझी पैसे देण्याची इच्छा नाही. शिपाई बाविस्कर, ग्रामपंचायत कार्यालय डोंगरकिन्ही यांच्यावर कारवाई होण्यास विंनती आहे. माझे तक्रारी सोबत माझे आईचे नावावर असलेल्या शेतजमीनीचा 7/12 ची झेरॉक्स प्रत देत आहे." तक्रारदार यांनी, दिलेल्या तक्रारीवर दोन्ही पंचानी, तक्रारदार यांनी व समक्ष म्हणुन मी सुध्दा सही केली.

आम्ही तक्रारदार व पंच क्र.01 यांना सूचना दिली की, शिपाई बाविस्कर, ग्रामपंचायत कार्यालय डोंगरकिन्ही हे तक्रादार यांना त्यांचे आईचा मृत्युचा दाखला देण्यासाठी 2500/- रु. लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत तक्रारदार व पंच क्र.01 यांना शिपाई बाविस्कर यांची भेट घेवून बोलणी करणेकरीता ग्रामपंचायत डोंगरकिन्ही येथे पाठविण्यात येणार असून तक्रारदार यांनी शिपाई बाविस्कर यांची भेट घेउन बोलनी करावी. तक्रारदार यांना त्यांचे शर्टाचे आतुन व्हाईस रेकॉर्डर लावले व पंच क्र.01 यांचे सह शिपाई बाविस्कर यांचे भेटीकरीता पाठविले. काही वेळाने तक्रारदार व पंच क्र.01 हे आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले. पडताळणी दरम्यान तक्रारदार व शिपाई बाविस्कर यांची ग्रामपंचात डोंगरकिन्ही येथे भेट झाली भेटी दरम्यान तक्रारदार हे शिपाई बाविस्कर यांना भेटल्यावर शिपाई बाविस्कर यांनी तक्रारदार यांचे आईचे नाव,मृत्यु दिंनाक बाबत विचारणा केली,

त्यांनतर शिपाई बाविस्कर हे तक्रारदार यांना म्हटले की, "आता तु आला आता तयार करून साहेबाचा सही शिक्का घेतो... आता तुय काम मार्ग लागल आता तु लोड घेवु नको. तुहया आईचं...आधार कार्ड पाठव फक्त" त्यावर तक्रारदार यांनी शिपाई बाविस्कर यांना म्हटले की,"हाव......व्हॉटस अप वर टाकुन देतो," त्यावर शिपाई बाविस्कर हे तक्रारदार यांना म्हटले की, "आमचा कार्यक्रम..." त्यावर तक्रारदार हे शिपाई बाविस्कर यांना म्हटले की, हो मंग तेच सांगानं" त्यावर शिपाई बाविस्कर हे तक्रारदार यांना म्हटले की, "दडकनं देलं की दडकनं काम..." त्यावर तक्रारदार हे शिपाई बाविस्कर यांना म्हटले की, "अडीच हजार लय व्हा लागलेनं..." त्यावर शिपाई बाविस्कर हे तक्रारदार यांना म्हटले की, "तुहया कामासाठी करा लागलो...गडया शंभर दोनशे कमी का जास्त देउन टाक.." त्यावर तक्रारदार हे शिपाई बाविस्कर यांना म्हटले की "शंभर दोनशे म्हणजे नेमके..किती?" त्यावर तक्रारदार हे शिपाई बाविस्कर यांना म्हटले की, "तुहा पंचविसेशे म्हणले तर.. शंभर दोनशे कमी कर काय करायचे त.." त्यावर तक्रारदार हे शिपाई बाविस्कर यांना म्हटले की "माहा म्हणनं होतं दिंडक हजार घ्यावावं..." त्यावर तक्रारदार हे शिपाई बाविस्कर यांना म्हटले की, "जाउदे दिडक हजार... जाउदे.... दोनकं हजार देउन टाक..."यावरुन शिपाई श्री बाविस्कर, ग्रामपंचायत कार्यालय डोंगरकिन्ही यांनी तक्रारदार यांना त्यांचे आईचा मृत्युचा दाखला देण्याकरीता 2,000/-रुपये स्पष्ट लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले व सदर लाच रक्कम ही आजच स्विकारणार असल्याचे निश्पन्न झाले. त्यानुसार दि. 11/03/2026 रोजी शिपाई बाविस्कर, ग्रामपंचायत कार्यालय डोंगरकिन्ही यांचेवर सापळा कारवाई ही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दि. 11/03/2026 रोजी सापळा कारवाई करीता आम्ही पोनि गायकवाड, लाप्रवि पथक, दोन्ही पंच व तक्रारदार असे सापळा कारवाई करीता मालेगाव ते वाशिम रोड वरील श्री संत गजानन महाराज मंदिर येथे हजर असतांना आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांना 2,000/- रु लाच रक्कम हजर करण्यास सांगीतली असता. तक्रारदार यांनी 2,000/- रु लाच रक्कम हजर केली. तक्रारदार यांनी हजर केलेल्या 2,000/- रु रक्कमेस अँन्थ्रॉसिन पावडर लावण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी शिपाई बाविस्कर यांना फोन लावुन कुठे भेटायचे अशी विचारणा केली असता शिपाई बाविस्कर यांनी जुन बसस्टॉन्ड मालेगाव येथे भेटु असे सांगीतल्याने सापळा कारवाई ही जुने बसस्टॅन्ड मालेगाव येथे आयोजीत करण्यात आली. तक्रारदार यांना लाच रक्कमेसह तसेच व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच क्र.02 सह तक्रारदार यांच्या मोटर सायकलवर पाठविले. तसेच त्यांचे पाठोपाठ जावुन जुने बसस्टॉन्ड मालेगाव येथे सापळा कारवाईचे पथक सापळा लावुन दबा धरुन बसले. शिपाई बाविस्कर व तक्रारदार यांची जुने बसस्टॉन्ड मालेगाव येथे भेट झाली. भेटी दरम्यान शिपाई बाविस्कर यांनी तक्रारदार यांना म्हटले की, आता ग्रामसेवकालं काही पैसे दयाचं काम नाही नं आता.. त्यावर शिपाई बाविस्कर तक्रारदार यांना म्हणाले की, अरे बाबा तु फक्त माहयावर भरोसा ठेव, आपलं काम लय क्लिअर हे... असे बोलत बोलत शिपाई बाविस्कर हे तक्रारदार यांना मराठा वाईन बार मध्ये घेउन गेले ", त्यांचे मागोमाग पंच क्र 2 हे सुध्दा मराठा बार मध्ये गेले. सापळा पथक सुध्दा

मराठा वाईन बार च्या आजुबाजुला दबा धरुन बसले. त्यांनतर शिपाई बाविस्कर यांनी तक्रारदार यांचेकडुन अंदाजे 16.08 वाजताचे सुमारास 2000/- रुपये लाच म्हणुन स्विकारले. तक्रारदार यांनी ठरल्याप्रमाणे सदर मराठा बार च्या बाहेर येवुन त्यांचे गळयातील षेला हातात घेवुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पूर्व नियोजीत इशारा केला. त्यावरून तात्काळ आम्ही, सापळा पथक असे शिपाई बाविस्कर कार्यालयात पोहचुन शिपाई बाविस्कर यांना 2,000 /रू लाच रक्कमेसह ताब्यात घेवुन त्यांच्या कडुन लाच रक्कम हस्तगत केली. शिपाई बाविस्कर यांना ताब्यात घेतले व पुढिल कारवाई करीता लाप्रवि कार्यालय वाशिम येथे आणण्यात आले.

शिपाई राजेश बळीराम बाविस्कर, वय-54 वर्षे पद- शिपाई, ग्रामपंचायत डोंगरकिन्ही, ता.मालेगाव जि.वाशिम यांनी तक्रारदार यांचे आईचा मृत्यु दाखला देण्याकरीता दि. 11/03/2026 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान 2000/- रुपये लाचेची स्पष्ट मागणी करुन दि. 11/03/2026 रोजी सापळा कारवाई 15.52 वा. ते 16.08 वा. दरम्यान शिपाई राजेश बळीराम बाविस्कर, वय-54 वर्षे, पद- शिपाई, ग्रामपंचायत डोंगरकिन्ही, ता.मालेगाव जि. वाशिम यांनी लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली. त्यांचे हे कृत्य कलम 7, 7Aभ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 प्रमाणे होत असल्याने माझी त्यांचे विरुध्द सरकातर्फे कायदेशिर फिर्याद आहे

(अल्का.एम.गायकवाड)
पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.वाशिम

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAJESH KRANTI KHERDE(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

A.M Gaikwad

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAJESH KRANTI KHE

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):